**वादीतर्फे साक्षीदार क्र.१–शपथेवर पुढील सरतपास वादीतर्फे वकील श्री.जी.एम.शेख–**

३४. माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी माझ्या सरतपासासोबत २६/१ सोबत प्रतिवादीस वकील श्रीमती.रुबिना मोमिन यांच्यामार्फत दिनांक ०१/०२/२०२० रोजी पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–२९** देण्यात येते.

३५. मी माझ्या सरतपासासोबत २६/२ सोबत प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३०** देण्यात येते.

३६. मी माझ्या सरतपासासोबत २६/३ सोबत प्रतिवादीस मिळालेल्या नोटीसची पोहोचपावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३१** देण्यात येते.

३७. मी माझ्या सरतपासासोबत २६/४ सोबत प्रतिवादीस वकील श्रीमती.रुबिना मोमिन यांच्यामार्फत दिनांक ०७/०७/२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३२** देण्यात येते.

३८. मी माझ्या सरतपासासोबत २६/५ सोबत प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची पावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३३** देण्यात येते.

३९. मी माझ्या सरतपासासोबत २६/६ सोबत प्रतिवादीने तिच्या वकीलांमार्फत दिनांक २१/०७/२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीस उत्तराची मुळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर प्रतिवादी व तिच्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर मला मान्य व कबुल नाही. त्यास **निशाणी–३४** देण्यात येते.

४०. मी माझ्या सरतपासासोबत २६/७ सोबत प्रतिवादीस वकील

श्रीमती.रुबिना मोमिन यांच्यामार्फत दिनांक २८/०८/२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३५** देण्यात येते.

४१. मी माझ्या सरतपासासोबत २६/८ सोबत प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची मुळपावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३६** देण्यात येते.

४२. मी माझ्या सरतपासासोबत २६/९ सोबत प्रतिवादीने तिच्या वकीलांमार्फत दिनांक ०५/०९/२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीस उत्तराची मुळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर प्रतिवादीच्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर मला मान्य व कबुल नाही. त्यास **निशाणी–३७** देण्यात येते.

४३. मी माझ्या सरतपासासोबत २६/१० सोबत प्रतिवादीस वकील श्रीमती.रुबिना मोमिन यांच्यामार्फत दिनांक २०/०९/२०२२ रोजी पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत दाखल केलेली आहे. त्यावर माझी व माझ्या वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३८** देण्यात येते.

४४. मी माझ्या सरतपासासोबत २६/११ सोबत प्रतिवादीस पाठविलेल्या नोटीसची पोस्टाची मुळपावती दाखल केलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यास **निशाणी–३९** देण्यात येते.

४५. मी माझ्या सरतपासासोबत २६/१२ सोबत प्रतिवादीस माझ्या वकीलांमार्फत पाठविलेली नोटीस न बजावता परत आल्याबाबत सदर नोटीसचा बंद लिफाफा दाखल केलेला आहे. त्यास **निशाणी–४०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री.नुर अन्सारी यांच्यामार्फत –**

४६. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीविरुध सन २०२० साली विवाहसंबंध पुन्हा नांदण्यास येण्यासाठी दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा

क्रमांक ११४/२०२० असा होता किंवा कसे हे मला आता आठवत नाही. आता मला **निशाणी–४२** सोबत दाखल नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२० च्या निशाणी–१ ची प्रमाणित प्रत दाखविण्यात आली. सदर दावा तोच असून त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी–४३** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, सदर दावा मी लोकअदालतीमध्ये दिनांक १२/११/२०२२ रोजी काढून घेतला होता. सदर दाव्यामध्ये प्रतिवादीने हजर होऊन तिची कैफियत दाखल केली होती किंवा कसे हे मला आता आठवत नाही. सदर कैफियतीमध्ये प्रतिवादीने ती नांदण्यास येण्यासाठी तयार असल्याचे नमूद केले होते. मी प्रतिवादीस दिनांक ०१/०२/२०२० रोजी निशाणी–२९ खालील नोटीस पाठविली त्यावेळी नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२० प्रलंबित होता किंवा कसे हे मला सांगता येणार नाही. मी नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२० काढून घेतला कारण त्यानंतर मी प्रतिवादीस घटस्फोटाची नोटीस दिली होती व त्यामुळे दोन्ही दावे एकाच वेळी चालू शकत नाहीत त्यामुळे मी तो दावा काढून घेतला. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०७/०७/२०२२ , दिनांक २०/०८/२०२२ व दिनांक ३०/०९/२०२२ (निशाणी–३२, ३५ व ३८) रोजीच्या नोटीसा नियमित दिवाणी दावा ११४/२०२० प्रलंबित असताना दिला होता. नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२० दाखल केल्यानंतर माझी प्रतिवादीसोबत कोणतीही तडजोड झाली नाही. आता मला निशाणी–४३ सोबत दाखल दावा काढून घेण्याची पुरसिस दाखविण्यात आली. त्यामध्ये माझी व प्रतिवादीची न्यायालया बाहेर तडजोड झाल्याचे नमूद केलेले आहे. साक्षीदार सांगतो की, अशा प्रकारची कोणतीही तडजोड झालेली नव्हती. सदर पुरसिस मधील मजकूर खोटा आहे परंतु त्यावर माझी सही आहे. सदर पुरसिस ही साक्षांकित प्रत आहे, त्यामुळे त्यास **निशाणी–४४** देण्यात येते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीस घटस्फोट देण्याच्या उद्देशाने मी नियमित दिवाणी दावा क्र.११४/२०२० काढून घेतला.

४७. मी प्रतिवादीस दिनांक ०७/०७/२०२२ रोजी दिलेल्या

नोटीसमधील मजकूर वाचला होता. आता मला सदर नोटीस दाखविण्यात आली. त्यामध्ये पुन्हा समेट घडवून आणण्याबाबत (Reconciliation) कोणतीही ऑफर देण्यात आली नव्हती. तसेच सदर नोटीसमध्ये तडजोड करण्याबाबत कोणतीही ऑफर देण्यात आली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीस घटस्फोट देण्याच्या उद्देशाने सदर नोटीस दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी–३२ वरील दिनांक ०७/०७/२०२२ रोजीची नोटीस दिल्याच्या दिवशी किंवा त्यानंतर सदर घटस्फोट दिल्याबाबत मी त्याची माहिती प्रतिवादीस दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०७/०७/२०२२ रोजीची नोटीस देण्यापूर्वी किंवा त्या आधी माझा व प्रतिवादीचा घटस्फोट झाला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने दिनांक २१/०७/२०२२ रोजी दिलेल्या नोटीस उत्तरात ती नांदण्यास येण्यास तयार असल्याचे नमूद केलेले आहे.

४८. मी प्रतिवादीस दिनांक २०/०८/२०२२ रोजी दिलेल्या दुस–या नोटीसमध्ये देखील मी प्रतिवादीस पुन्हा समेट घडवून आणण्यासाठी किंवा तडजोडीसाठी कोणतीही ऑफर दिल्याचे नमूद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर दुसरी नोटीस मी प्रतिवादीस घटस्फोट देण्याच्या उद्देशाने दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीस निशाणी–३५ खाली दुसरी नोटीस दिली त्यावेळी किंवा त्यापूर्वी आमच्यामध्ये घटस्फोट झाला नव्हता.

**प्रश्न –** तुम्ही प्रतिवादीस दिनांक २०/०९/२०२२ रोजी पाठविलेली तिसरी नोटीस प्रतिवादीस मिळाली नाही, त्यामुळे प्रतिवादीने सदर नोटीसला उत्तर दिलेले नाही.

**उत्तर–** सदर नोटीस पाठविली असता ती प्रतिवादीने घेण्यास नकार दिला अशा शे–यासह सदर नोटीस परत आलेली आहे.

४९. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादीस दिनांक २०/०९/२०२२ रोजी दिलेल्या तिस–या नोटीसच्या वेळी किंवा त्यापूर्वी माझा व प्रतिवादीचा घटस्फोट झाला नव्हता.

**प्रतिवादीच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by PRAMOD MANIK KOLSE
Date: 2026.06.20 18:17:26 +0530

**( प्र. मा. कोळसे )**

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
भिवंडी, जिल्हा ठाणे.

ठिकाण – भिवंडी.
दिनांकः २०/०६/२०२६.